ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ पुणें, बुधवार तारीख ११ एप्रिल, १९५६ अंक १५

## विविध माहिती

**जपान लोखंडाची माती घेणार**—जपानमधील लोखंड व पोलादाच्या कारखान्यांच्या संयुक्त संघटनेनें १९५६ सालीं भारताकडून ११,००,००० टन लोहमिश्रित माती विकत घेण्याचें ठरविलें आहे. त्यापैकीं ९,००,००० टन माती मामुली आयात मार्गानें आणण्याची व्यवस्था झाली आहे. दर टनाला १०८ शिलिंग असा वहातुकीचा भाव ठरला आहे. मातीची निर्यात कलकत्त्याहून करण्यांत येईल.

**भारताचा परदेशीय व्यापार**—भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारताच्या परदेशी व्यापारांत ३० टक्के वाढ होईल अशी अपेक्षा उद्योग व व्यापारमंत्री श्री. टी. कृष्णम्माचारी ह्यांनीं व्यक्त केली आहे. ह्या अवधींत आशिआ व आफ्रिका खंडांतील राष्ट्रांबरोबरचा व्यापार वाढण्याची शक्यता आहे, असेंहि ते म्हणाले. परदेशांत असलेल्या राजनैतिक प्रतिनिधींबरोबर काम करणाऱ्या व्यापारी प्रतिनिधींनीं ह्या बाबतींत लक्ष द्यावें अशी सूचना त्यांनीं केली.

**एकूण मालमत्तेवर कर**--मध्यवर्ती सरकारचे महसूलमंत्री श्री. एम. सी. शहा ह्यांनीं अहमदाबादमध्यें बोलतांना असें सांगितलें कीं, व्यक्तीच्या एकूण मालमत्तेवर कर बसविण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यांत येत आहे.

**पण्णीकरांचें नवें पुस्तक**—मानवी समाजाच्या सांस्कृतिक व शास्त्रविषयक कार्याची माहिती देणारी ग्रंथमाला सरदार पण्णीकर लिहित आहेत. त्यापैकीं शेवटच्या ग्रंथांतील कांहीं माहिती जमविण्यासाठी ते हॉलंडला गेले होते. पुस्तकाचीं पानें सुमारें ८०० होतील आणि संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या सांस्कृतिक शाखेतर्फे तें प्रसिद्ध करण्यांत येईल. आणखी कांहीं संदर्भ मिळविण्यासाठी ते ऑक्सफर्डला जाणार आहेत.

**बंगालमध्यें दारूबंदी नाहीं**--पश्चिम बंगालमध्यें एप्रिल १९५८ च्या आंत दारूबंदी जारी करण्यांत येणार नाहीं. इतर राज्यांत दारूबंदीचे प्रयोग फारसे आशादायक नसल्याचें मत मुख्य मंत्री डॉ. रॉय ह्यांनीं व्यक्त केलें आहे. शिवाय, आर्थिक दृष्ट्या बंगाल फारसा बळकट नसल्यामुळें त्याला दारूवरील अबकारी कराचें उत्पन्न सोडून देतां येणें कठीण जाईल, असेंहि ते म्हणाले.

**उद्योगपतीचें निधन**—श्री. घनश्यामदास बिर्ला ह्यांचे वडील राजा बलदेवदास बिर्ला हे नुकतेंच निधन पावले. ते आपल्या दानशूरत्वाबद्दल प्रसिद्ध होते. त्यांनीं दिलेल्या मोठ्या देणग्यांत बनारस हिंदु विद्यापीठाला दिलेली ३० लाख रुपयांची एक देणगी आहे. त्यांनीं तत्त्वज्ञानावर हिंदी भाषेंत पुस्तकें लिहिलीं आहेत. मरणसमयीं त्यांचें वय ९३ वर्षांचें होतें.

**अबकारी करांत वाढ**—भोपाळ राज्य सरकारनें गांजा, देशी दारू व परदेशी पद्धतीची पण गांवठी बनावटीची दारू ह्यांच्यावरील अबकारी कराच्या दरांत वाढ करण्याचें ठरविलें आहे. १९५६-५७ सालांत नवे कर बसवून १२ लाख रुपये उभे करण्याचें सरकारचें धोरण आहे. अबकारी करांतील दरांत वाढ केल्यामुळें सरकारला वार्षिक ४ लाख रुपयांचें अधिक उत्पन्न होईल.

**आंध्रच्या पूर्व किनाऱ्यावर तेल**—आंध्र राज्याच्या पूर्व किनाऱ्यावर खनिज तेल सांपडण्याची शक्यता आहे, अशी माहिती मध्यवर्ती सरकारचे मंत्री श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं लोकसभेंत सांगितली. तथापि नक्की जागा सांपडण्यासाठीं अधिक तपास करणें जरूरीचें आहे, असें ते म्हणाले. ह्या भागांतील भूप्रदेशाची अधिक तपशीलवार पहाणी केल्यावर चांचणीसाठीं विहिरी खणण्यांत येणार आहेत.

**बर्फ फोडून चालणारी बोट**—सोव्हिएट शास्त्रज्ञ व एंजिनिअर्स अणुशक्तीच्या साह्यानें बर्फ फोडून चालणारी बोट बांधण्याच्या उद्योगांत आहेत. ह्या बोटीचें वजन १६,००० टन असेल आणि ती २४ तासांत अवघें २४ ग्रॅम युरेनिअम जाळील. दोन ते तीन वर्षे पुरेल इतका युरेनिअमच्या इंधनाचा साठा ती एकदम करून घेईल. अणुशक्तीवर चालणाऱ्या बोटींपैकी ही पहिलीच बोट असेल.

**पाकिस्तानांत धान्याचा तुटवडा**—पाकिस्तानच्या पंजाब भागांत अन्नधान्याचा तुटवडा पडल्याच्या वार्ता आहेत. गहूं आणि आटा ह्या पदार्थांच्या किंमती ४० टक्क्यांनीं वाढल्या आहेत. पाकिस्तानी सरकारच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या मतानें साठेबाज आणि काळा बाजारवाले ह्यांच्या कारवायांचा हा परिणाम असून सरकारजवळ धान्याचा पुरेसा साठा आहे.

**कांडला बंदरावरील खर्च**— १९५६–५७ सालच्या आर्थिक वर्षांत कांडला बंदराच्या विकासावर ४·६२ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. कच्छ राज्यांतील विकास–योजनांसाठी भारतीय सरकारनें ६·३७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्याशिवाय राज्य सरकारनेंहि कांहीं रक्कम ह्या कामासाठीं खर्चण्याचें ठरविलें आहे.

**कापसाचा सहकारी कारखाना**—सुरतपासून जवळ असलेल्या मरोळी ह्या गांवीं कापसाचे गठ्ठे दाबण्याचा एक सहकारी कारखाना काढण्यांत आला आहे. मरोळी गांवच्या आसपास असलेल्या ४४ खेड्यांतील ८०० शेतकरी ह्या कारखान्याचे सभासद झाले आहेत. कारखान्यासाठी ३ लाख रुपयांचें भांडवल जमविण्यांत आलें आहे.

**अमेरिकेंतील मद्यपान**—अमेरिकेच्या लुइझिआना राज्यांतील धर्मार्थ इस्पितळांत काम करणारे डॉ. मॅकगिल ह्यांनीं अमेरिकेंतील मद्यपानाविषयीं पुढीलप्रमाणें माहिती जाहीर केली आहे. त्यांच्या अंदाजाप्रमाणें अमेरिकेंत ७ कोटी अमेरिकन लोक दारू पितात; पण त्यांपैकीं ४ कोटींपेक्षा थोडे अधिक लोकच दारूबाज आहेत असें म्हणतां येईल. ह्यापैकीं ६,६०,००० स्त्रिया आहेत. प्रथम समाजरूढी म्हणून दारू पिणाऱ्या १६ लोकांपैकीं १ नंतर दारूबाज होतो.

**पंचगंगा सहकारी कारखाना**—इचलकरंजी येथें काढण्यांत यावयाच्या सहकारी साखर कारखान्याचें काम पहाण्यासाठी मुंबई सरकारनें १५ जणांचें बोर्ड नेमलें आहे. त्यांपैकीं ९ डायरेक्टर्स उसाच्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहेत. कारखान्याचें नांव पंचगंगा शुगर फॅक्टरी असें आहे. कोल्हापूर जिल्ह्यांत काढण्यांत येणाऱ्या तीन सहकारी साखर कारखान्यांपैकीं तो एक आहे.

**सहकाराचें शिक्षण देणारें केंद्र**—सहकारी संस्थांत काम करण्याचें शिक्षण देणारें एक केंद्र भावनगर येथें भावनगरच्या महाराजांच्या हस्तें स्थापन करण्यांत आलें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या यशासाठी सहकाराचें शिक्षण घेऊन तयार झालेल्या अधिकाऱ्यांची फार गरज आहे, असे उद्गार ह्या प्रसंगीं अध्यक्ष श्री. बलवंतराय मेहता ह्यांनीं काढले.

**भारतीय आंकडेशास्त्रज्ञाची सफर**—इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेला आंकडेशास्त्रविषयक सल्ला देणारे डॉ. व्ही. जी. पानसे ह्यांनीं जागतिक शेती व अन्न-संघटनेतर्फे दोन कामगिऱ्या सांपण्यांत आल्या आहेत. इजिप्तच्या सरकारला मच्छीमारीच्या धंद्याविषयीं आंकडेशास्त्रविषयक सल्ला देण्यासाठीं ते गेले आहेत. मेक्सिकोच्या सरकारलाहि ते शेतीसंबंधीं असाच सल्ला देतील.

**बोटींच्या वहातुकीचा विस्तार**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत भारतामधील बोटींच्या वहातुकीचा विस्तार करण्यासाठी ५६ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं १० कोटी रुपये खाजगी भांडवलदारांकडून उभारले जाण्याची शक्यता आहे. बोट-वहातूक कंपन्यांना कर्जें आणि स्वतःची गुंतवणूक मिळून ४६ कोटी रुपये सरकार खर्च करील.

**जयसिंगपूरला पाण्याचा पुरवठा**—सांगलीपासून ६ मैलांवर असलेल्या जयसिंगपूर ह्या गांवाच्या म्युनिसिपालिटीनें पाणीपुरवठ्याची योजना आंखली आहे. योजनेसाठी ६,३५,००० रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. त्यापैकीं निम्मी रक्कम मुंबई सरकारनें मंजूर केली आहे असें समजतें. बाकीची रक्कम म्युनिसिपालिटीनें जमा करावयाची आहे.

**सौराष्ट्र सरकारची खबरदारी**—सौराष्ट्र सरकारनें राज्यांतील ११ म्युनिसिपालिट्यांना मिळून ९ लाख रुपयांची रक्कम मदतीदाखल दिली आहे. येत्या पावसाळ्यांत पुरामुळें व इतर कारणानें होणाऱ्या संभाव्य हानीपासून बचाव करण्याचीं कामें म्युनिसिपालिट्यांनीं करावीं, म्हणून ही मदत देण्यांत आली आहे.

**रेल्वेच्या डब्यांचे भाग**—रेल्वेच्या डब्यांना लागणारे सुटे भाग तयार करण्याचा एक कारखाना बनारस येथें काढण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. कारखाना चालू झाल्यावर सुट्या भागांची परदेशांकडून करण्यांत येणारी आयात बंद करतां येईल. हा कारखाना पेरांबूर येथील कारखान्याला पूरक असा होईल.

## दि बँक ऑफ सिटिझन्स लि.

### चेअरमन, श्री. जी. डी. सराफ, ह्यांचें भाषण

दि बँक ऑफ सिटिझन्स लि. बेळगांव या बँकेची १९ वी वार्षिक सभा बँकेच्या मुख्य कचेरींत, १५१४ मारुतिगल्ली, बेळगांव येथें, ता. ३०-३-५६ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां भरली होती. सभेस सुमारें १०० भागीदार उपस्थित होते. प्रारंभीं बँकेचे चेअरमन श्री. जी. डी. सराफ यांचें प्रास्ताविक भाषण झालें. त्या भाषणांत ते म्हणाले "आज या बँकेचें भांडवल रु. ४,३५,१५०, रिझर्व फंड रु. १,०१,१००, एकूण ठेवी रु. २५,२८,८३२ व खेळतें भांडवल रु. ३७,४३,१०९ एवढें आहे. या वर्षी मुदती ठेवी व सेव्हिंग्ज बँकमध्यें वाढ झालेली दिसून येते. यावरून जनतेचा या बँकेवरील विश्वास वाढत आहे, असें म्हणणेस हरकत नाहीं. या वर्षी आपल्या बँकेला लायसेन्स मिळून ती शेड्यूल्ड होईल अशी मला उमेद आहे. बँकेची स्वतःची इमारत बैलहोंगल येथें असून या वर्षी बँकेनें खानापूर येथें स्वतःची इमारत बांधली असून बेळगांव येथेंहि लवकरच बँकेची भव्य इमारत सुरू करणेचा चालकांचा विचार आहे.

"आतां या वर्षापासून द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्यें आपण पदार्पण करणार आहोंत. या पंचवार्षिक योजनेंत रु. ४८०० कोटी खर्च होणार असल्यामुळें व डिफिसीट फायनॅन्स जवळजवळ २५ टक्क्यानें म्हणजे रु. १,२०० कोटी असल्यानें वस्तूंच्या किंमतीचें मान खालीं येईल असें वाटत नाहीं. जर वरील खर्च होणारा पैसा बँकांमध्यें मोठ्या प्रमाणावर ठेवण्याचा उपक्रम चालू ठेवला गेला तर त्यामुळें ही पंचवार्षिक योजना यशस्वी होण्यास खात्रीनें सुलभ जाईल. ज्याप्रमाणें सरकार नोटा छापून पैसा तयार करतें, त्याप्रमाणें बँका रकमा कर्जाऊ देऊन पैसा तयार करीत असतात. तरी हा बँकांचा पैसा नवीन उत्पादन वाढविणेस उपयोगी पडो" असें इच्छून त्यांनीं आपलें भाषण पुरें केलें. त्यानंतर ता. ३१-१२-'५५ चें अखेरपर्यंतचें ताळेबंद व नफातोटापत्रक पास झालें व डायरेक्टरांची एकमतानें निवडणूक झाली व शेवटीं अध्यक्षांचे आभार व अल्पोपहार झाल्यावर सभेचें कामकाज संपलें.

त्याच दिवशीं ताबडतोब बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरांची सभा भरून श्री. जी. डी. सराफ हेच पुढील वर्षाकरितां बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे चेअरमन म्हणून एकमतानें निवडल्याचें जाहीर केलें गेलें.

---

## "अणुगर्भावें अधिक संशोधन"

संपादक "अर्थ" ह्यांस,

वरील मथळ्याखाली "अर्था"च्या दि. २८ मार्चच्या अंकांत दिलेल्या माहितींत 'यंत्रांत वापरण्यांत येणाऱ्या विजेच्या शक्तीचा दाब कोटयवधि व्होल्टस आहे" असें वाक्य आहे. त्यांत 'व्होल्टस' ऐवजीं 'इलेक्ट्रॉन् व्होल्टस' असें पाहिजे. तसेंच, ३६,००० टन वजनाचा लोहचुंबक असलेल्या यंत्रांत वापरण्यांत येणाऱ्या विजेच्या शक्तीचा दाब 'कोटयवधि' ऐवजीं 'अब्जावधि' व्होल्टस पाहिजे.

वरील दुरुस्तीस कृपेनें प्रसिद्धि दिल्यानें, आपल्या पत्रांतील विधानांच्या शुद्धतेविषयीं विश्वास वाढण्यास मदतच होणार आहे.

अहमदाबाद ६.
२-४-१९५६

ग. वा. देशभर

# अर्थ

बुधवार, ता. ११ एप्रिल, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## जागतिक बँकेकडून कर्ज मिळणार

आशिआंतील अविकसित देशांची आर्थिक प्रगति घडवून आणण्यासाठी अमेरिकन सरकार मदत करीत आहे. भारतालाहि अमेरिकन सरकार चांगली मदत करीत आहे. पण त्या सरकारकडून जशी मदत मिळत आहे तशी मदत खाजगी अमेरिकन भांडवल-दारांकडून मिळत नाहीं. खाजगी अमेरिकन भांडवलदारांना भारतासारख्या देशांत भांडवल गुंतविण्यास प्रलोभन वाटत नसण्याचाहि संभव आहे. ह्या बाबतींत टाटा कंपनीला आलेला अनुभव लक्षांत घेण्यासारखा आहे. टाटा कंपनीला आपल्या जमशेटपूर येथील कारखान्याचा विस्तार करण्यासाठी ७ कोटी डॉलर्स भांडवलाची गरज होती. ही रक्कम खाजगी अमेरिकन भांडवलदारांकडून मिळविण्याचा प्रयत्न कंपनीनें केला. पण त्या कामीं यश आलें नाहीं. आतां जागतिक बँकेकडून जरूर ती रक्कम कर्जाऊ मिळणार आहे असें समजतें. जमशेटपूरच्या पोलादाच्या कारखान्याची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी कंपनीनें योजना आखली आहे. त्यासाठी जरूर असणारें कर्ज कंपनीला एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेकडूनहि मिळालें असतें. पण ही बँक कर्ज देतांना अशी अट घालते कीं कर्जाचा उपयोग करून अमेरिकन कारखान्यांकडूनच जरूर त्या मालाची खरेदी करण्यांत आली पाहिजे. पण तसें करणें टाटा कंपनीला आर्थिक दृष्ट्या परवडणार नाहीं. कारण, निदान सध्यां तरी अमेरिकेंतील कारखानदारी स्वरूपाचा माल युरोपमधील कारखानदारी मालापेक्षा अधिक महाग आहे. जागतिक बँक लवकरच आपलें एक तज्ज्ञांचें मंडळ भारताच्या आर्थिक व द्रव्यविषयक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी पाठविणार आहे. ज्या राष्ट्रांना कर्ज द्यावयाचें त्यांची आर्थिक पत अजमाऊन पहाण्यासाठी अशीं मंडळें बँके-तर्फे नेहमींच पाठविलीं जातात. जागतिक बँक ज्या देशाला कर्ज देते, त्या देशाच्या सरकारकडून त्याबद्दल हमी घेतें. जमशेटपूरच्या पोलादाच्या कारखान्याची विस्ताराची योजना भारतीय सरकारनें मंजूर केलेली आहे.

---

## हातमागाच्या कापडाची निर्यात

अखिल भारतीय हातमाग बोर्डाच्या स्थायी समितीची बैठक मुंबई येथें भरली होती. हातमागाच्या उत्तम प्रतीच्या मालाची निर्यात करतां येण्याची शक्यता अजमावण्यासाठी समितीनें एका निर्यात-कमिटीची नेमणूक केली. कमिटीवर सरकारी व बिनसरकारी प्रतिनिधी आहेत. भारतांत आतां हातमागाचा व्यवसाय स्थिर पायावर उभा करण्याची व्यवस्था झाली असल्या-मुळें समितीनें निर्यातीकडे लक्ष देण्यास सुरवात केली आहे. हातमाग-कामगारांच्या कर्जबाजारीपणाबद्दलच्या अहवालाचाहि समितीनें आपल्या बैठकींत विचार केला. रेशमी कापड काढ-णाऱ्या विणकरांना मदत करण्यासाठी एक दोन प्रायोगिक योजना आखण्यांत याव्या, अशी सूचना समितीनें भारतीय सरकारला केली आहे. ह्या विणकरांच्या कर्जाबद्दलच्या योजना अंमलांत आल्यावर सरकारला थोडाबहुत अनुभव येईल आणि देशाच्या निरनिराळ्या भागांतील विणकरांच्या बाबतींतहि अशाच योजना हातीं घेण्यासाठी माहितीहि उपलब्ध होईल, असा समितीचा अंदाज आहे. गेल्या फेब्रुवारी महिन्यांत देशांत साजरा झालेल्या अखिल भारतीय हातमाग सप्ताहाचा आढावा समितीनें घेतला. हा सप्ताह यशस्वी रीतीनें पार पाडण्यांत आला असें मत समितीनें व्यक्त केलें असून दर वर्षीच्या फेब्रुआरी महिन्यांतील तिसरा आठवडा सप्ताह साजरा करण्यासाठी ठरविण्यांत यावा, असें सुचविलें आहे. सध्यां खादी सिल्कच्या विक्रीच्या किंमतीवर सूट देण्यांत येते त्याचप्रमाणें हातमागावरील रेशमाच्या कापडाच्या बाबतींतहि सूट देण्यांत यावी, असा निर्णय समितीनें घेतला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत हातमागाच्या व्यवसायाला आपलें उत्पादन दुप्पट करावयाचें आहे. सध्यांची सुताची चणचण आणि चढत्या किंमती लक्षांत घेतां दर हातमागामागें २०० रुपये खेळतें भांडवल पुरविण्याच्या सरकारच्या धोरणाबद्दल नापसंती व्यक्त करण्यांत आली व हें भांडवल दर मागाला निदान ३०० रुपये असावें, अशी मागणी करण्यांत आली.

---

## भारत–युगोस्लाव्हिआ व्यापारी करार

भारत आणि युगोस्लाव्हिआ ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार करण्यांत आला आहे. उभयता देशांचें राजकारणाच्या क्षेत्रांत जें सहकार्य आहे त्याला आर्थिक बाजूनें बळकटी आणण्याचा कराराचा हेतु आहे. सध्यां होणाऱ्या परस्परांच्या व्यापारांत आणखी वाढ करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें, भारतीय औद्योगिक संघटना आणि युगोस्लाव्हिआच्या औद्योगिक संघटना ह्यांच्यांत अधिक सहकार्य घडवून आणण्यासाठी शास्त्रीय व तांत्रिक बाबतींत देवाण–घेवाण करण्यांत येणार आहे. व्यापारी कराराची मुदत १ एप्रिल, १९५६ ते ३१ डिसेंबर, १९५९ अशी ठेवण्यांत आली आहे. भारताकडून युगोस्लाव्हिआला बराच माल पाहिजे आहे, त्यांत पुढील मालाचा समावेश प्रामुख्यानें होतो. लोहमिश्रित माती, मँगेनीजची माती, अभ्रक, लाख, चहा, कॉफी, तंबाखू, मसाल्याचे पदार्थ, कातडीं व चामडीं, सुती कापड, कापूस, लोकर, तागाच्या वस्तू आणि ग्रामोद्योगाचा माल. उलटपक्षीं, युगोस्लाव्हिआकडून भारताला, लोखंड व पोलादाच्या वस्तू, रेल्वेचें साहित्य, अल्युमिनमचा माल, डिझेल तेलावर चालणारीं रेल्वेचीं व इतर एंजिनें, ट्रॅक्टर्स, मोटारी, विजेचीं उपकरणें, गुरांच्या दवाखान्यासाठी व दंतवैद्यांना लागणारें साहित्य, बोटी, खाणीची यंत्रसामुग्री, सिमेंट, इत्यादि माल मिळण्यासारखा आहे. भारताला आपली दर्यावर्दी वहातूक करण्यासाठी बोटींची आवश्यकता आहे. ही गरज युगोस्लाव्हिआ भागवूं शकेल. युगोस्लाव्हिआनें रशिआ, स्विट्झरलंड, चीन व इतर कांहीं देशांना बोटी पुरविल्या आहेत. त्या देशांना पुरविण्यांत आलेल्या बोटी समाधानकारक ठरल्या आहेत. जगांत इतरत्र बांधल्या जाणाऱ्या बोटींच्या किंमतीशीं टक्कर देऊं शकतील अशाच किंमती युगोस्लाव्हिआच्या बोटींच्या आहेत.

## नव्या कंपनी कायद्याचा कारभार

### रजिस्ट्रारचे व्यापक अधिकार

जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या बाबतींतील एक विशेष म्हटला म्हणजे त्यांच्या स्थापनेची, तसेंच तत्संबंधित सर्व कागदपत्रांची सरकारदप्तरीं रीतसर नोंद करावी लागते. अशी नोंद करून घेण्यासाठी रजिस्ट्रार ऑफ कंपनीज हा अधिकारी असतो. अर्थात्, कंपनी कायद्याच्या अस्तित्वाबरोबरच हा अधिकारीहि अस्तित्वांत आलेला आहे.

### जुनी पद्धति

इ. स. १९१३ च्या कंपनी कायद्याऐवजीं आतां १९५४ चा कंपनी कायदा अस्तित्वांत आला आहे. राज्यघटनेन्वयें, कंपन्यांसंबंधीं कायदे करण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारवर सोपविण्यांत आलेली आहे. तथापि, आतांपर्यंत कंपन्यांच्या कारभारांत मध्यवर्ती सरकार स्वत: प्रत्यक्षपणें लक्ष न घालतां, जुन्या कायद्यानुसार हे अधिकार राज्यांकडे सुपूर्द करीत असे. असें करण्यास राज्यघटनात्मक, तशींच आर्थिक कारणें होतीं. अवश्य ती कारभार-यंत्रणा असणाऱ्या राज्यांना या कायद्याच्या पायमल्लीचीं प्रकरणें हाताळणें अधिक सोयीचें व कमी खर्चाचें काम होतें. तसेंच आर्थिक धोरण सुस्पष्ट नसल्याकारणानें कंपनी कायद्याचें यथायोग्य महत्त्व समजून आलेलें नव्हतें आणि कायदाभंग होण्यास आळा घालणें, हेंच कारभारयंत्रणेचें प्रधान कर्तव्य मानण्यांत येत असे.

या जुन्या पद्धतींत जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारांची नेमणूक करण्याचें व त्यांच्यावर हुकमत ठेवण्याचें काम राज्य-सरकारांकडे असे, आणि रजिस्ट्रारची कचेरी म्हणजे प्रामुख्यानें कागदपत्रांची नोंद करून घेण्याचें स्थळ असे. हिशेबाच्या कांहीं ठराविक तक्त्यांची जुजबी तपासणी फार तर होई. पूर्ण वेळ काम करणारे रजिस्ट्रारहि कांहीं राज्यांतच असत. १९१३ चा कंपनी कायदा १ एप्रिल, १९५१ पासून 'ब' विभागीय राज्यांना लागू करण्यांत आला. परंतु तेथेंहि या कायद्याची अंमलबजावणी तीं राज्य-सरकारें एजन्सी पद्धतीवर करीत. या पद्धतीविषयीं १९५२ च्या कंपनी कायदा समितीनें पुढील मत व्यक्त केलें होतें:-"व्यापार व उद्योगधंद्यांबाबतच्या मध्यवर्ती सरकारच्या कायद्यांत, कमींत कमी व्यवस्थितपणें अंमलबजावणी होणारा कंपनी कायदा हाच एक कायदा असेल."

### मध्यवर्ती नियंत्रण

या परिस्थितीस आळा घालण्याच्या हेतूनेंच कंपनी कायदा विधेयक संमत होण्यापूर्वीच, म्हणजे १ ऑक्टोबर १९५३ पासून राज्यांना सोपविलेले हे कारभारात्मक अधिकार स्वत:कडे घेण्यासाठी उपाय योजण्यास मध्यवर्ती सरकारनें प्रारंभ केला, आणि १ जानेवारी १९५५ पासून हा कारभारात्मक बदल परिणामकारकतेनें अंमलांत आला. आतां अ व ब विभागीय, तसेंच दिल्ली व इतर क विभागीय राज्यांत पूर्ण वेळ काम करणारे रजिस्ट्रार आहेत. त्यांच्या कचेऱ्यांतून स्वतंत्र पूर्ण वेळ काम पाहणारा नोकरवर्ग नेमण्यांत आलेला आहे. नव्या कायद्यांत प्रत्येक राज्यांत रजिस्ट्रारची कचेरी असली पाहिजे असें बंधन आहे. कचेरींतील कामकाजाच्या पद्धतींतहि समानता आणण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे.

रजिस्ट्रारांच्या कामांत सुसूत्रता आणण्यासाठी, त्यांच्या कामांत मार्गदर्शन करण्यासाठी व देखरेख करण्यासाठी तसेंच रजिस्ट्रार व मध्यवर्ती सरकार यांच्या दरम्यानच नव्हे तर मध्यवर्ती सरकार व राज्य सरकारें यांच्य दरम्यान एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करण्यासाठी मद्रास मुंबई, कलकत्ता व दिल्ली येथें चार प्रादेशिक संचालक कचेऱ्य स्थापन करण्यांत आल्या आहेत. पश्चिम विभागाची कचेर मुंबई येथें रहाणार असून या विभागांत मुंबई, हैद्राबाद, मध्य प्रदेश व सौराष्ट्र हीं राज्यें मोडतात.

या कचेऱ्यांचे प्रमुख असणारे संचालक वरिष्ठ अधिकार असतात. त्यांच्या दिमतीस एक कंपनी अकाउंटंट व एक कंपनी सॉलिसिटर असतात. हेहि दोन्ही अधिकारी अनुभवी असतात. रजिस्ट्रारांच्या कामावर सर्वसाधारणत: देखरेख करणें आणि सल्ला मागण्यांत आला असतां तो देणें, हीं कामे या कचेऱ्यांकडून होतात.

### स्वतंत्र खात्याची स्थापना

याखेरीज १ ऑगस्ट, १९५५ पासून कंपनी कायदा कारभाराचें एक स्वतंत्र खातें मध्यवर्ती ठिकाणीं स्थापन करण्यां आलें असून, तें केवळ कंपनी कायद्यासंबंधांतच नव्हे तर जॉइं स्टॉक कंपन्यांच्या कामकाजाबाबतच्या सर्व कामांबाबत ल घालतें. यावरून ही गोष्ट लक्षांत येईल कीं, कंपन्यांचे कारभा कायद्यानुसार चालतात कीं नाहीं हें पाहण्याचेंच नव्हे त भांडवल उभारणीशीं त्यांच्या कार्याची सुसूत्रता राहील याक लक्ष देण्याचें, तसेंच देशाच्या सुनियोजित आर्थिक विकासा महत्त्वाची भूमिका पार पाडण्यास खाजगी भांडवलवाल्यांन मदत करण्याचें काम हें खातें करतें.

या खात्याचे दोन विभाग आहेत. सेक्रेटरी टु दि गव्हर्मेंट ह त्यांचा मुख्य. प्रत्येक विभागाचा प्रमुख एक जॉइंट सेक्रेटरी असतो. एक विभाग कंपनी कायद्याच्या कारभाराकडे लक्ष देतो आणि खात्याचीं इतर कामें पाहण्याचें काम दुसऱ्या विभागाकडे असतें. कंपनी कायद्याच्या कारभाराबाबत एक कायदेशीर सल्लागार मंडळ खात्यास सल्ला देण्यासाठी असतें.

रजिस्ट्रार ऑफ कंपनीज या अधिकाऱ्याचें काम विविध स्वरूपाचें असतें : कंपन्यांच्या स्थापनेबाबतचे सर्व आवश्यक कागदपत्र नोंदून घेणें हें एक; कंपनी कायद्यानुसार ठरवून देण्यांत आलेले हिशेबाचे तक्ते वगैरे सर्व कागदपत्रें योग्य मुदतींत व योग्य प्रकारें कंपन्या आपणांकडे पाठवितात कीं नाहीं त्याकडे लक्ष देणें हें दुसरें; आणि त्या हिशेबांची छाननी करणें हें तिसरें आणि सर्वांत महत्त्वाचें काम आहे. या छाननींत रजिस्ट्रारला जर असें वाटलें कीं, कंपनीच्या कारभारांत कांहीं गंभीर स्वरूपाचा घोटाळा आहे तर ती परिस्थिति दूर करण्यासाठी अवश्य ते उपाय योजण्याचे अधिकार रजिस्ट्रारला कायद्यानें दिलेले आहेत. तदनुसार कंपनीनें पाठविलेल्या कागदपत्रासंबंधांत खुलासा मागण्याचा अधिकार रजिस्ट्रारला आहे. रजिस्ट्रारच्या मागणीवरून कंपनीनें दिलेलें असें स्पष्टीकरण हें रजिस्ट्रारपाशीं असलेल्या त्या कंपनीच्या कागदपत्रांचें एक अंग बनतें. असें स्पष्टीकरण मिळाल्यानंतरहि कंपनीच्या कारभारांत सुधारणा दिसून आली नाहीं, तर त्यानें ही गोष्ट मध्यवर्ती सरकारच्या नजरेस आणावयाची असते.

या कायदेशीर अधिकाराव्यतिरिक्त कंपन्यांनीं सादर केलेल्या हिशेबांबाबत व तक्त्यांबाबत संबंधित पक्षांशीं विचारविनिमय करून शंकास्पद गोष्टींचा खुलासा करून घेण्याचीहि रजिस्ट्रारला मुभा असते. म्हणजे, पाठविलेल्या कागदपत्रांत जर कांहीं दुर्लक्षा पद्धतीमुळें उणीवा राहून गेल्या असतील तर त्या तेथल्या तेथें दुरुस्त करतां येतात.

## आर्थिक चळवळीचा सामाजिक जीवनावरील परिणाम

### अमेरिकेंतील ‘ मध्यम ’ वर्ग

जुन्या, श्रीमंत, सुशिक्षित अशा घराण्यांतील लोकांच्या ‘ उच्च ’ वर्गात अमेरिकेंतील सुमारें ३ टक्के लोक मोडतात. त्यांचे विवाह एकमेकांत होतात. त्यांचीं मुलें श्रीमंत शाळा–कॉलेजांत शिक्षण घेतात. त्याच्या खालोखाल ‘ मध्यम ’ वर्ग येतो; त्यांत ७० ते ८० टक्के लोकांचा भरणा आहे. त्या सर्वांची परिस्थिति चांगली असते. त्यांपैकी कित्येकांच्या जवळ दोन कॅडिलॅक मोटारगाड्या व मोटरलॉँच असतात; कांहींच्या जवळ सहा–सात वर्षांची जुनी फोर्ड गाडी तरी असतेच. सर्वजणांचे पोशाख व खाणें–पिणें ह्यांत फरक नसतो; सर्वांचें वागणें, बोलणें, चालणें एकाच प्रकारचें असतें.

त्याच्याखालील ‘ कनिष्ठ–मध्यम ’ वर्गात १० ते २५ टक्के लोक आहेत. त्यांना इतरांच्या मानानें पुष्कळच कमी संधि मिळते. मत देण्याच्या भानगडींत ते पडत नाहींत, वाचनाची त्यांना गोडी नसते, आणि कनिष्ठ दर्जाचें कामच त्यांच्या वांट्यास येतें. त्याहिखालीं “ खालचा कनिष्ठ ’ वर्ग येतो, पण तो अमेरिकन सामाजिक जीवनाचा भाग आहे, हें इतर कोणी लक्षांतहि घेत नाहीं. निग्रो लोकांतील दर्जा मोजण्याचेहि प्रकार आहेत, ते वेगळेच.

अमेरिकेंत खानदानीस वावच नाहीं. प्रत्येक सात वर्षांत, पांचांपैकी चार लोक आपली राहण्याची जागा बदलत असतात; तेव्हां त्यांना प्रतिष्ठितपणा प्राप्त होण्याइतका दीर्घकाळ ते शेजारीं रहातात तरी कुठें ? गेल्या पंधरा वर्षांत, अमेरिकेची इतकी भरभराट झालेली आहे कीं कोणाची प्राप्ति किती असेल हें कळूंच शकत नाहीं. प्रत्येकाजवळच मोटारगाडी असते. कांहीं श्रीमंत लोक आपलें वैशिष्ट्य दाखविण्यासाठीं, कॅडिलॅकऐवजीं फोर्ड, किंवा इतर ‘ साध्या ’ गाड्या वापरतात. प्रत्येकजण स्वतःच गाडी चालवितो; उतारू म्हणून बसत नाहीं. कोणीहि टेनिस किंवा गोल्फ खेळूं शकतो किंवा बर्फावरील ‘ स्की ’ खेळासाठी जाऊं शकतो. साधे शेतकरीसुद्धां विमानानें दूरचा प्रवास करून खेळ व शिकार साधतात.

सबंध दिवस काम करणारा नोकर ठेवणें कोणासच परवडत नाहीं, पण प्रत्येकाच्या हाताखालीं अनेक यांत्रिक नोकर असतात. कोणीच कोणाला ‘ सर ’ म्हणत नाहीं. कोणालाहि आपल्या मुलाला विद्यापीठांत शिक्षणासाठीं धाडतां येतें; शिक्षणाच्या खर्चापैकी फक्त १० किंवा १५ टक्के खर्च विद्यार्थ्याला करावा लागतो. कांहीं कॉलेजांतून पुस्तकेंहि पुरविलीं जातात; कॉलेजांत येण्या–जाण्याचा खर्च तेवढा ज्याचा त्यानें करावा लागतो.

उद्योगपति हा त्याच्या कचेरींतील गालिचे, त्याचा खाजगी सेक्रेटरी किंवा प्रचंड टेबल ह्यावरून तेथें ओळखला जाईल; पण बाहेरच्या वातावरणांत किंवा मद्यगृहामध्यें तो इतरांच्यांत मिसळून जाईल. प्रत्येकालाच इतरांपेक्षा वरिष्ठ दर्जा हवासा वाटला तरी तो लाभत नाहीं व लाभला तरी टिकत नाहीं, इतकी स्पर्धा एकसारखी चालू असते. आज आघाडीवर असलेला उद्या मागें पडतो, मागचा पुढें जातो व तोहि कालांतरानें मागें पडतो. पण व्यक्तिशः पाहिलें, तर सर्वच जण आर्थिक भरभराटीच्या दिशेनें पुढें पुढेंच जात असतात !

—सह्याद्रि, एप्रिल १९५५

### मुंबई राज्यांतील औद्योगिक जॉइंट स्टॉक कंपन्या

| वर्ष | कंपन्या नोंदल्या | कंपन्या बंद पडल्या | वाढ अथवा घट | चालू कंपन्यांच्या अधिकृत भांडवलांत वाढ अथवा घट |
|---|---|---|---|---|
| १९५०–५१ | ३९६ | ३४२ | ५४ | –१३,७१,४८,७०० |
| १९५१–५२ | ३२१ | ३११ | १० | २,७५,१८,०१५ |
| १९५२–५३ | २११ | २९१ | –८० | २३,४३,०६,४८० |
| १९५३–५४ | २४१ | ९७१ | –३० | –४,३५,७३,७१५ |
| १९५४–५५ | २३८ | २३३ | +५ | +४६,३७,१३,४०० |

### मुंबई राज्यांतील औद्योगिक उत्पादन

| उद्योगधंदा | | उत्पादन | |
|---|---|---|---|
| | | १९५३ | १९५४ |
| १ साखर | टन | १,३०,२१० | १,५८,६६४ |
| २ वनस्पति | टन | ६७,००० | ६८,६४६ |
| ३ मीठ | बं. मण | २,३९,६१,००० | २,२२,४८,००० |
| ४ लोकरी माल | पौंड | ८२,७५,००० | ५१,२७,९३४ |
| ५ आगपेट्या | ग्रो. पेट्या | ४९,६०,००० | ५३,५०,७९५ |
| ६ साबण | टन | ४८,६०० | ४८,१०० |
| ७ विजेचे पंखे | संख्या | ३३,६०० | १९,८५० |
| ८ सायकली | संख्या | १,२०,००० | १,३०,००० |
| १ रंग व व्हार्निश | टन | ११,५०० | ११,५०० |
| २ सल्फ्यूरि. ॲसि. | टन | ८,३०० | ६,५०० |
| १ डीझेल इंजिनें | संख्या | ४,१५० | ७,५०० |
| | रु. (लक्ष) | ८२ | १२३ |
| २ विजेच्या मोटारी | संख्या | १२,८०० | १६,००० |
| ३ विजेचे ट्रान्सफॉर्मर्स् | संख्या | २,४०० | ३,४०० |
| ४ मशीन टूल्स | रु. (लक्ष) | ३·६७ | ६·५० |

### मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा

राष्ट्रीय योजनेचाच एक भाग असलेल्या मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा गेल्या नोव्हेंबरमध्यें प्रसिद्ध करण्यांत आला. मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठीं एकूण २८३ कोटी रुपये खर्च येणार आहे. या मसुद्यांत राज्याच्या योजनेबाबतची तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. तथापि, सदरहू मसुद्याची थोडक्यांत कल्पना देणारी संक्षिप्त आवृत्ति “ जनता आवृत्ति ” या नांवानें मुंबई सरकारच्या प्रसिद्धि खात्यातर्फे प्रसिद्ध करण्यांत आली आहे. या आवृत्तीवरून सर्वसामान्य वाचकांस मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतील महत्त्वाच्या योजनांची कल्पना येईल.

आकर्षकपणें छापलेल्या या पुस्तिकेंत अनेक चित्रेंहि देण्यांत आलीं आहेत. ही पुस्तिका प्रत्येक नागरिकास खरेदी करतां यावी म्हणून तिची किंमत अगदीं थोडी म्हणजे फक्त ४ आणे ठेवण्यांत आली आहे. पुस्तिकेच्या हिंदी आणि मराठी, गुजराती व कन्नड, या प्रादेशिक भाषांतील आवृत्त्या लौकरच प्रसिद्ध होतील. पुस्तिकेच्या प्रती गव्हर्नमेंट बुक डेपो व डायरेक्टर ऑफ पब्लिसिटी, सचिवालय, मुंबई यांच्या कचेरींत विक्रीस ठेवण्यांत आल्या आहेत.

## नव्या कंपनी कायद्याचा कारभार

### रजिस्ट्रारचे व्यापक अधिकार

जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या बाबतींतील एक विशेष म्हटला म्हणजे त्यांच्या स्थापनेची, तसेंच तत्संबंधित सर्व कागदपत्रांची सरकारदप्तरीं रीतसर नोंद करावी लागते. अशी नोंद करून घेण्यासाठीं रजिस्ट्रार ऑफ कंपनीज हा अधिकारी असतो. अर्थात, कंपनी कायद्याच्या अस्तित्वाबरोबरच हा अधिकारीहि अस्तित्वांत आलेला आहे.

### जुनी पद्धति

इ. स. १९१३ च्या कंपनी कायद्याऐवजीं आतां १९५४ चा कंपनी कायदा अस्तित्वांत आला आहे. राज्यघटनेन्वयें, कंपन्यां-संबंधीं कायदे करण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारवर सोपविण्यांत आलेली आहे. तथापि, आतांपर्यंत कंपन्यांच्या कारभारांत मध्यवर्ती सरकार स्वत: प्रत्यक्षपणें लक्ष न घालतां, जुन्या कायद्यानुसार हे अधिकार राज्यांकडे सुपूर्द करीत असे. असें करण्यास राज्यघटनात्मक, तशींच आर्थिक कारणें होतीं. अवश्य ती कारभार-यंत्रणा असणाऱ्या राज्यांना या कायद्याच्या पायमल्लीचीं प्रकरणें हाताळणें अधिक सोयीचें व कमी खर्चाचें काम होतें. तसेंच आर्थिक धोरण सुस्पष्ट नसल्याकारणानें कंपनी कायद्याचें यथायोग्य महत्त्व समजून आलेलें नव्हतें आणि कायदाभंग होण्यास आळा घालणें, हेंच कारभारयंत्रणेचें प्रधान कर्तव्य मानण्यांत येत असे.

या जुन्या पद्धतींत जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारांची नेमणूक करण्याचें व त्यांच्यावर हुकमत ठेवण्याचें काम राज्य-सरकारांकडे असे, आणि रजिस्ट्रारची कचेरी म्हणजे प्रामुख्यानें कागदपत्रांची नोंद करून घेण्याचें स्थळ असे. हिशेबाच्या कांहीं ठराविक तक्त्यांची जुजबी तपासणी फार तर होई. पूर्ण वेळ काम करणारे रजिस्ट्रारहि कांहीं राज्यांतच असत. १९१३ चा कंपनी कायदा १ एप्रिल, १९५१ पासून 'ब' विभागीय राज्यांना लागू करण्यांत आला. परंतु तेथेंहि या कायद्याची अंमलबजावणी तीं राज्य-सरकारें एजन्सी पद्धतीवर करीत. या पद्धतीविषयीं १९५२ च्या कंपनी कायदा समितीनें पुढील मत व्यक्त केलें होतें:– "व्यापार व उद्योगधंद्यांबाबतच्या मध्यवर्ती सरकारच्या कायद्यांत, कमींत कमी व्यवस्थितपणें अंमलबजावणी होणारा कंपनी कायदा हाच एक कायदा असेल."

### मध्यवर्ती नियंत्रण

या परिस्थितीस आळा घालण्याच्या हेतूनेंच कंपनी कायदा विधेयक संमत होण्यापूर्वीच, म्हणजे १ ऑक्टोबर १९५३ पासून राज्यांना सोपविलेले हे कारभारात्मक अधिकार स्वतःकडे घेण्या-साठीं उपाय योजण्यास मध्यवर्ती सरकारनें प्रारंभ केला, आणि १ जानेवारी १९५५ पासून हा कारभारात्मक बदल परिणाम-कारकतेनें अंमलांत आला. आतां अ व ब विभागीय, तसेंच दिल्ली व इतर क विभागीय राज्यांत पूर्ण वेळ काम करणारे रजिस्ट्रार आहेत. त्यांच्या कचेऱ्यांतून स्वतंत्र पूर्ण वेळ काम पाहणारा नोकरवर्ग नेमण्यांत आलेला आहे. नव्या कायद्यांत प्रत्येक राज्यांत रजिस्ट्रारची कचेरी असली पाहिजे असें बंधन आहे. कचेरींतील कामकाजाच्या पद्धतींतहि समानता आण-ण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे.

रजिस्ट्रारांच्या कामांत सुसूत्रता आणण्यासाठीं, त्यांच्या कामांत मार्गदर्शन करण्यासाठीं व देखरेख करण्यासाठीं तसेंच रजिस्ट्रार व मध्यवर्ती सरकार यांच्या दरम्यानच नव्हे तर मध्यवर्ती सरकार व राज्य सरकारें यांच्या दरम्यान एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करण्यासाठीं मद्रास, मुंबई, कलकत्ता व दिल्ली येथें चार प्रादेशिक संचालक कचेऱ्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. पश्चिम विभागाची कचेरी मुंबई येथें रहाणार असून या विभागांत मुंबई, हैद्राबाद, मध्य-प्रदेश व सौराष्ट्र हीं राज्यें मोडतात.

या कचेऱ्यांचे प्रमुख असणारे संचालक वरिष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या दिमतीस एक कंपनी अकाउंटंट व एक कंपनी सॉलिसिटर असतात. हेहि दोन्ही अधिकारी अनुभवी असतात. रजिस्ट्रारांच्या कामावर सर्वसाधारणत: देखरेख करणें आणि सल्ला मागण्यांत आला असतां तो देणें, हीं कामें या कचेऱ्यांकडून होतात.

### स्वतंत्र खात्याची स्थापना

याखेरीज १ ऑगस्ट, १९५५ पासून कंपनी कायदा कार-भाराचें एक स्वतंत्र खातें मध्यवर्ती ठिकाणीं स्थापन करण्यांत आलें असून, तें केवळ कंपनी कायद्यासंबंधांतच नव्हे तर जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या कामकाजाबाबतच्या सर्व कामांबाबत लक्ष घालतें. यावरून ही गोष्ट लक्षांत येईल कीं, कंपन्यांचे कारभार कायद्यानुसार चालतात कीं नाहीं हें पाहण्याचेंच नव्हे तर भांडवल उभारणीशीं त्यांच्या कार्याची सुसूत्रता राहील याकडे लक्ष देण्याचें, तसेंच देशाच्या सुनियोजित आर्थिक विकासांत महत्त्वाची भूमिका पार पाडण्यास खाजगी भांडवलवाल्यांना मदत करण्याचें काम हें खातें करतें.

या खात्याचे दोन विभाग आहेत. सेक्रेटरी टु दि गव्हर्मेंट हा त्यांचा मुख्य. प्रत्येक विभागाचा प्रमुख एक जॉइंट सेक्रेटरी असतो. एक विभाग कंपनी कायद्याच्या कारभाराकडे लक्ष देतो, आणि खात्याचीं इतर कामें पाहण्याचें काम दुसऱ्या विभागाकडे असतें. कंपनी कायद्याच्या कारभाराबाबत एक कायदेशीर सल्लागार मंडळ खात्यास सल्ला देण्यासाठीं असतें.

रजिस्ट्रार ऑफ कंपनीज या अधिकाऱ्याचें काम विविध स्वरूपाचें असतें : कंपन्यांच्या स्थापनेबाबतचे सर्व आवश्यक कागदपत्र नोंदून घेणें हें एक; कंपनी कायद्यानुसार ठरवून देण्यांत आलेले हिशेबाचे तक्ते वगैरे सर्व कागदपत्रें योग्य मुदतींत व योग्य प्रकारें कंपन्या आपणांकडे पाठवितात कीं नाहीं त्याकडे लक्ष देणें हें दुसरें; आणि त्या हिशेबांची छाननी करणें हें तिसरें आणि सर्वांत महत्त्वाचें काम आहे. या छाननींत रजिस्ट्रारला जर असें वाटलें कीं, कंपनीच्या कारभारांत कांहीं गंभीर स्वरूपाचा घोटाळा आहे तर ती परिस्थिति दूर करण्यासाठीं अवश्य ते उपाय योजण्याचे अधिकार रजिस्ट्रारला कायद्यानें दिलेले आहेत. तदनुसार कंपनीनें पाठविलेल्या कागदपत्रासंबंधांत खुलासा मागण्याचा अधिकार रजिस्ट्रारला आहे. रजिस्ट्रारच्या मागणी-वरून कंपनीनें दिलेलें असें स्पष्टीकरण हें रजिस्ट्रारपाशीं असलेल्या त्या कंपनीच्या कागदपत्रांचें एक अंग बनतें. असें स्पष्टीकरण मिळाल्यानंतरहि कंपनीच्या कारभारांत सुधारणा दिसून आली नाहीं, तर त्यानें ही गोष्ट मध्यवर्ती सरकारच्या नजरेस आणा-वयाची असते.

या कायदेशीर अधिकाराव्यतिरिक्त कंपन्यांनीं सादर केलेल्या हिशेबांबाबत व तक्त्यांबाबत संबंधित पक्षांशीं विचारविनिमय करून शंकास्पद गोष्टींचा खुलासा करून घेण्याचीहि रजिस्ट्रारला मुभा असते. म्हणजे, पाठविलेल्या कागदपत्रांत जर कांहीं चुकीच्या पद्धतीमुळें उणीवा राहून गेल्या असतील तर त्या तेथल्या तेथें दुरुस्त करतां येतात.

## आर्थिक चळवळीचा सामाजिक जीवनावरील परिणाम

### अमेरिकेंतील 'मध्यम' वर्ग

जुन्या, श्रीमंत, सुशिक्षित अशा घराण्यांतील लोकांच्या 'उच्च' वर्गांत अमेरिकेंतील सुमारें ३ टक्के लोक मोडतात. त्यांचे विवाह एकमेकांत होतात. त्यांचीं मुलें श्रीमंत शाळा–कॉलेजांत शिक्षण घेतात. त्याच्या खालोखाल 'मध्यम' वर्ग येतो; त्यांत ७० ते ८० टक्के लोकांचा भरणा आहे. त्या सर्वांची परिस्थिति चांगली असते. त्यांपैकीं कित्येकांच्या जवळ दोन कॅडिलॅक मोटारगाड्या व मोटरलॉंच असतात; कांहींच्या जवळ सहा–सात वर्षांची जुनी फोर्ड गाडी तरी असतेच. सर्वजणांचे पोशाख व खाणें–पिणें ह्यांत फरक नसतो; सर्वांचें वागणें, बोलणें, चालणें एकाच प्रकारचें असतें.

त्याच्याखालील 'कनिष्ठ–मध्यम' वर्गांत १० ते २५ टक्के लोक आहेत. त्यांना इतरांच्या मानानें पुष्कळच कमी संधि मिळते. मत देण्याच्या भानगडींत ते पडत नाहींत, वाचनाची त्यांना गोडी नसते, आणि कनिष्ठ दर्जाचें कामच त्यांच्या वांट्यास येतें. त्याहिखालीं "खालचा कनिष्ठ' वर्ग येतो, पण तो अमेरिकन सामाजिक जीवनाचा भाग आहे, हें इतर कोणी लक्षांतहि घेत नाहीं. निग्रो लोकांतील दर्जा मोजण्याचेहि प्रकार आहेत, ते वेगळेच.

अमेरिकेंत खानदानीस वावच नाहीं. प्रत्येक सात वर्षांत, पांचांपैकी चार लोक आपली राहण्याची जागा बदलत असतात; तेव्हां त्यांना प्रतिष्ठितपणा प्राप्त होण्याइतका दीर्घकाळ ते शेजारीं रहातात तरी कुठें? गेल्या पंधरा वर्षांत, अमेरिकेची इतकी भरभराट झालेली आहे कीं कोणाची प्राप्ति किती असेल हें कळूंच शकत नाहीं. प्रत्येकाजवळच मोटारगाडी असते. कांहीं श्रीमंत लोक आपलें वैशिष्ट्य दाखविण्यासाठी, कॅडिलॅकऐवजीं फोर्ड, किंवा इतर 'साध्या' गाड्या वापरतात. प्रत्येकजण स्वतःच गाडी चालवितो; उतारू म्हणून बसत नाहीं. कोणीहि टेनिस किंवा गोल्फ खेळूं शकतो किंवा बर्फावरील 'स्की' खेळासाठी जाऊं शकतो. साधे शेतकरीसुद्धां विमानानें दूरचा प्रवास करून खेळ व शिकार साधतात.

सबंध दिवस काम करणारा नोकर ठेवणें कोणासच परवडत नाहीं, पण प्रत्येकाच्या हाताखालीं अनेक यांत्रिक नोकर असतात. कोणीच कोणाला 'सर' म्हणत नाहीं. कोणालाहि आपल्या मुलाला विद्यापीठांत शिक्षणासाठी धाडतां येतें; शिक्षणाच्या खर्चापैकी फक्त १० किंवा १५ टक्के खर्च विद्यार्थ्याला करावा लागतो. कांहीं कॉलेजांतून पुस्तकेंहि पुरविलीं जातात; कॉलेजांत येण्या–जाण्याचा खर्च तेवढा ज्याचा त्यानें करावा लागतो.

उद्योगपति हा त्याच्या कचेरींतील गालिचे, त्याचा खाजगी सेक्रेटरी किंवा प्रचंड टेबल ह्यावरून तेथें ओळखला जाईल; पण बाहेरच्या वातावरणांत किंवा मद्यगृहामध्यें तो इतरांच्यांत मिसळून जाईल. प्रत्येकालाच इतरांपेक्षा वरिष्ठ दर्जा हवासा वाटला तरी तो लाभत नाहीं व लाभला तरी टिकत नाहीं, इतकी स्पर्धा एकसारखी चालू असते. आज आघाडीवर असलेला उद्या मागें पडतो, मागचा पुढें जातो व तोहि कालांतरानें मागें पडतो. पण व्यक्तिशः पाहिलें, तर प्रत्येक जण आर्थिक भरभराटीच्या दिशेनें पुढें पुढेंच जात असतात!

—सह्याद्रि, एप्रिल १९५५

### मुंबई राज्यांतील औद्योगिक जॉइंट स्टॉक कंपन्या

| वर्ष | कंपन्या नोंदल्या | कंपन्या बंद पडल्या | वाढ अथवा घट | चालू कंपन्यांच्या अधिकृत भांडवलांत वाढ अथवा घट |
|---|---|---|---|---|
| १९५०–५१ | ३९६ | ३४२ | ५४ | –१३,७१,४८,७०० |
| १९५१–५२ | ३२१ | ३११ | १० | २,७५,१८,०१५ |
| १९५२–५३ | २११ | २९१ | –८० | २३,४३,०६,४८० |
| १९५३–५४ | २४१ | ९७१ | –३० | –४,३५,७३,७१५ |
| १९५४–५५ | २३८ | २३३ | +५ | +४६,३७,१३,४०० |

### मुंबई राज्यांतील औद्योगिक उत्पादन

| उद्योगधंदा | | उत्पादन | |
|---|---|---|---|
| | | १९५३ | १९५४ |
| १ साखर | टन | १,३०,२१० | १,५८,६६४ |
| २ वनस्पति | टन | ६७,००० | ६८,६४६ |
| ३ मांठ | बं. मण | २,३९,६१,००० | २,२२,८०,००० |
| ४ लोकरी माल | पौंड | ८२,७५,००० | ५१,२७,९३४ |
| ५ आगपेट्या | ग्रो. पेट्या | ४९,६०,००० | ५३,५०,७९५ |
| ६ साबण | टन | ४८,६०० | ४८,१०० |
| ७ विजेचे पंखे | संख्या | ३३,६०० | १९,८५० |
| ८ सायकली | संख्या | १,२०,००० | १,३०,००० |
| १ रंग व व्हार्निश | टन | ११,५०० | ११,५०० |
| २ सल्फ्यूरि. ॲसि. | टन | ८,३०० | ६,५०० |
| १ डीझेल इंजिनें | संख्या | ४,१५० | ७,५०० |
| | रु. (लक्ष) | ८२ | १२३ |
| २ विजेच्या मोटारी | संख्या | १२,८०० | १६,००० |
| ३ विजेचे ट्रान्सफॉर्मर्स | संख्या | २,४०० | ३,४०० |
| ४ मशीन टूल्स | रु. (लक्ष) | ३·६७ | ६·५० |

### मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा

राष्ट्रीय योजनेचाच एक भाग असलेल्या मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा गेल्या नोव्हेंबरमध्यें प्रसिद्ध करण्यांत आला. मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी एकूण २८३ कोटी रुपये खर्च येणार आहे. या मसुद्यांत राज्याच्या योजनेबाबतची तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. तथापि, सदरहू मसुद्याची थोडक्यांत कल्पना देणारी संक्षिप्त आवृत्ति "जनता आवृत्ति" या नांवानें मुंबई सरकारच्या प्रसिद्धि खात्यातर्फे प्रसिद्ध करण्यांत आली आहे. या आवृत्तीवरून सर्वसामान्य वाचकांस मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतील महत्त्वाच्या योजनांची कल्पना येईल.

आकर्षकपणें छापलेल्या या पुस्तिकेंत अनेक चित्रेंहि देण्यांत आलीं आहेत. ही पुस्तिका प्रत्येक नागरिकास खरेदी करतां यावी म्हणून तिची किंमत अगदीं थोडी म्हणजे फक्त ४ आणे ठेवण्यांत आली आहे. पुस्तिकेच्या हिंदी आणि मराठी, गुजराती व कन्नड, या प्रादेशिक भाषांतील आवृत्त्या लौकरच प्रसिद्ध होतील. पुस्तिकेच्या प्रती गव्हर्नमेंट बुक डेपो व डायरेक्टर ऑफ पब्लिसिटी, सचिवालय, मुंबई यांच्या कचेरींत विक्रीस ठेवण्यांत आल्या आहेत.

## भारतांतील लिमिटेड कंपन्या

### भारतांत नोंदविण्यांत आलेल्या कंपन्यांची संख्या व वसूल भांडवल दाखविणारें पत्रक

( भांडवलाची रक्कम कोटी रुपयांत )

| ३१ मार्च रोजीं | कंपन्यांची संख्या | वसूल भांडवल |
|---|---|---|
| १९०० | १३४० | ३४·७ |
| १९१३ | २५५२ | ७२·१ |
| १९१४ | २७४४ | ७६·६ |
| १९१९ | २७८९ | १०६·६ |
| १९२० | ३६६८ | १२३·२ |
| १९२१ | ४७०८ | १६४·५ |
| १९२२ | ५१८९ | २३०·५ |
| १९२९ | ६३३० | २७९·३ |
| १९३६ | १०६२७ | ३०२·६ |
| १९३७ | ११२२९ | ३११·५ |
| ( ब्रह्मदेश सोडून ) | | |
| १९३८ | १०६५७ | २७९·२ |
| १९३९ | ११११४ | २९०·४ |
| १९४५ | १४८५९ | ३८९·० |
| १९४६ | १७३४३ | ४२४·२ |
| १९४७ | २१८५३ | ४७८·७ |
| ( फक्त भारत ) | | |
| १९४८ | २२६७५ | ५६९·६ |
| १९४९ | २५३४० | ६२८·३ |
| १९५० | २७५५८ | ७२३·९ |
| १९५१ | २८५३२ | ७७५·४ |
| १९५२ | २९२२३ | ८५५·८ |
| १९५३ | २९३१२ | ८९७·६ |
| १९५४ | २९५२८ | ९४४·९ |
| १९५५ | २९७७९ | ९८३·१ |
| १९५५ (डिसेंबर) | २९९४८ | १०१३·३ |

**बस कंपनी काढण्यास परवानगी नाकारली**—अमेरिकेंतील निग्रो विद्यार्थ्यांना शिक्षणसंस्थांतून प्रवेश देण्याबाबत दक्षिणेकडील संस्थानांत गोऱ्या लोकांनीं विरोध चालविला आहे. विरोधाला उत्तर म्हणून अलबामा राज्यांतील मॉंटगोमरी शहरांतील निग्रो लोकांनीं बस-कंपनीवर बहिष्कार घातला आहे. बस-कंपनीनें निग्रोंना बसावयाच्या वेगळया जागा ठेवल्या होत्या. निग्रो लोकांनीं चालविलेली नवी बस कंपनी काढण्यास परवानगी नाकारण्यांत आली आहे.

**ब्रिटनच्या अणुशस्त्राची चांचणी**— ऑस्ट्रेलिआच्या वायव्येस असलेल्या मॉंटे बेलो ह्या बेटावर ब्रिटन आपल्या तिसऱ्या अणुशस्त्राची पुढील महिन्यांत चांचणी करणार आहे. अणुशस्त्राचा स्फोट पोलादाच्या मनोऱ्यावरून करण्यांत येईल. १९५२ सालीं करण्यांत आलेल्या स्फोटापेक्षा ह्या स्फोटामुळें किरणोत्सर्ग कमी होईल. ऑस्ट्रेलिआच्या मुख्य भूमीला कोणताहि उपसर्ग पोंचणार नाहीं.

## म्युनिसिपालिट्यांना आर्थिक साह्य

मुंबई सरकारनें खालील म्युनिसिपालिट्यांना त्यांच्या पाणी-पुरवठ्याच्या व कंपोस्टच्या योजनांसाठी आर्थिक साहाय्य मंजूर केलें आहे.

**हुबळी म्युनिसिपालिटी**— पाणीपुरवठ्याच्या योजनेंत सुधारणा करण्यासाठी तीन लाख रुपयांचें कर्ज. या कर्जावर ४॥ टक्के दरानें व्याज आकारण्यांत येईल व कर्ज ३० वार्षिक हप्त्यांनीं परत करावयाचें आहे.

**सुरत म्युनिसिपालिटी**–सुरत पाणीपुरवठा योजना व वाराच्छा वॉटरवर्क्ससाठी ग्रिड योजनेची वीज घेणें यासाठी एकूण खर्चाच्या ½ इतकी म्हणजे ५९,३२८ रुपयांची ग्रँट.

**सातारा म्युनिसिपालिटी**— पाणीपुरवठ्याच्या योजनेसाठी ४॥ टक्के व्याजाच्या दरानें ५,४५,४०० रुपयांचें कर्ज. तें ३० वार्षिक हप्त्यांनीं परत करावयाचें आहे.

**धारवाड बरो म्युनिसिपालिटी**— पाणीपुरवठ्याच्या योजने-साठी ४॥ टक्के व्याजाच्या दरानें ८,५२,८०० रुपयांचें कर्ज. तें ३० वार्षिक हप्त्यांनीं परत करावयाचें आहे.

**लोणावळा म्युनिसिपालिटी**–लोणावळा येथील तुंगार्ली धरणास प्रेशर ग्राऊटिंग करण्याच्या योजनेसाठीं येणाऱ्या खर्चा-च्या ½ इतकी म्हणजे ४२,०६६ रुपयांची ग्रँट.

**पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील दोंडाइचा वरवडे म्युनिसिपालिटी**—शहरी कंपोस्टच्या योजनेसाठी ४॥ टक्के व्याजाच्या दरानें २०,००० रुपयांचें कर्ज. तें १० वार्षिक हप्त्यांनीं परत करावयाचें आहे.

**नांदगांव म्युनिसिपालिटी**—( नाशिक जिल्हा ) शहरी कंपोस्ट योजनेसाठी ४॥ टक्के व्याजाच्या दरानें २५,००० रुपयांचें कर्ज. तें १० वार्षिक हप्त्यांनीं परत करावयाचें आहे.


किर्लोस्कर


आपल्या उन्हाळी पिकांची जोपासना करण्यासाठी ★

सेंट्रिफ्युगल पंप

(टाइप:-एन्.वी.एस.)

★

अधिक माहिती मागवा




किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी

तमाम दंतरोगांवर

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### कायदेमंडळाच्या नवीन इमारतीवरील खर्च

म्हैसूरचें सरकार आपल्या कायदेमंडळासाठी 'विधान सौध' नांवाची टोलेजंग इमारत बांधीत आहे. राज्याच्या विधानसभेच्या एस्टिमेटस कमिटीनें अशी सूचना केली आहे कीं, ह्या इमारतीसाठीं करण्यांत आलेल्या खर्चाची चौकशी करण्यांत यावी. कमिटीवर १२ सभासद आहेत. ह्यासंबंधी केलेल्या अहवालांत कमिटीनें असें सुचविलें आहे कीं, भावी कालांत राज्यकारभार हाकणाऱ्यांच्या मार्गदर्शनासाठीं अशी चौकशी करणें अगत्याचें आहे. चौकशीकमिटीवर स्थापत्यशास्त्र ह्या विषयांतील तज्ज्ञांची नेमणूक करण्यांत यावी. एस्टिमेटस कमिटीनें आपल्या अहवालांत असें नमूद केलें आहे कीं, प्रथम केलेल्या अंदाजाप्रमाणें इमारतीसाठीं ५० लाख रुपये खर्च येणार होता. परंतु आतां खर्चाचा अंदाज १३० लाख रुपयांच्या घरांत गेला आहे. ह्यासंबंधी चौकशी करण्यांत आली, तर निष्कारण खर्च कोठें होत असल्यास तो समजून येण्यास मदत होईल. इमारतीवर होणाऱ्या खर्चाव्यतिरिक्त सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतर्फे इमारतीच्या आवारांत रस्ते आणि बगीचा करण्यासाठीं आणखी बराच खर्च होण्याचा संभव आहे. कामाचे हिशोबहि व्यवस्थितपणें ठेवण्यांत आलेले नाहींत. ह्यासंबंधी मुख्य एंजिनिअरचा हवाला देऊन असें सांगण्यांत आलें आहे कीं, हिशेबांच्या बाबतींतील दोष लायक लोक कामावर न ठेवल्यामुळें निर्माण झालेले आहेत. इमारत ज्या कारणासाठीं वापरण्यांत यावयाची आहे तें प्रयोजन लक्षांत घेतां वास्तुशास्त्रविषयक सल्ला, सजावट आणि इतर सुखसोयी ह्या बाबींवर जरूर नसलेला खर्च करण्यांत आलेला आहे. सार्वजनिक मालकीचा पैसा अशा तऱ्हेनें वापरणें योग्य ठरणार नाहीं. इमारतीमध्यें उपयुक्ततेच्या दृष्टीनें जी व्यवस्था करण्यांत आली आहे, ती करण्यासाठीं झालेला खर्चहि फार आहे. ह्यासाठीं जितका खर्च करण्यांत आला आहे, त्याच्या निम्म्या खर्चांत आधुनिक पद्धतीची सर्व व्यवस्था करतां आली असती असें मत कमिटीनें व्यक्त केलें आहे.

---

**१०,००० अंबर चरखे तयार करणार**—अंबर चरख्यांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचा निर्णय भारतीय सरकारनें अद्याप घेतलेला नाहीं. पण दरम्यान १०,००० अंबर चरखे तयार करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. अंबर चरख्यांचा उपयोग दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पूर्णपणें करून घ्यावयाचें ठरल्यास कार्यक्रमांतील खर्चांत १५० ते २०० कोटी रुपयांपर्यंत वाढ होईल अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली.

**वाढत्या लोकसंख्येचें भवितव्य**—विकासवादाचे संशोधक डार्विन ह्यांचे नातू सर चार्लस डार्विन ह्यांनीं मनुष्यजातीच्या भवितव्याचें निराशाजनक चित्र रेखाटलें आहे. ते म्हणतात कीं, जगाच्या लोकसंख्येंत रोज ८०,००० ते ९०,००० तोंडांची भर पड आहेत. हें असेंच चालू राहिलें तर दोन हजार वर्षांत जगाची लोकसंख्या सध्यांच्या १० लाखपट होईल व प्रत्येक माणसाला जेमतेम उभी रहाण्यापुरतीच जागा मिळेल.

**प्लॅस्टिकचें हृदय तयार झालें**—फ्रेंच शास्त्रज्ञांनीं प्लॅस्टिकचें हृदय तयार करून तें कुत्र्याच्या शरीरांत नैसर्गिक हृदयाच्या जागीं बसविण्यांत यश मिळविलें आहे असें समजतें. हें हृदय ९ औंस वजनाचें असून तें विजेच्या मोटारनें चालू ठेवण्यांत येतें. त्याच्या साह्यानें प्रयोगांतील प्राणी बऱ्याच काळपर्यंत जिवंत ठेवण्यांत आले. माणसाच्या शरीरांत त्याचा उपयोग करण्याच्या कामीं मात्र बरेच अडथळे आहेत.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

**सरदारगृह**

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



**माधवाश्रम लि.** भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.



**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड ऑफिस : पुणें शहर
शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००चे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

पोस्ट बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. २४८३

पुणें जिल्ह्यांतील सर्व जनतेच्या विश्वासास पात्र झालेली ही सहकारी मध्यवर्ती बँक असून गेलीं आठ वर्षें आपले भागीदारांस ६ टक्के डिव्हिडंड देत आहे. भागविक्री चालू आहे. बँकेचे मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीची सोय आहे. पुणें शहरांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय प्रथमतः आपल्या बँकेनेंच सुरू केली. जिल्ह्यांत सर्व तालुक्याचे ठिकाणीं बँकेच्या शाखा असून त्यांचे मार्फत बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. बँकेची सर्वांगीण प्रगति खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| (१) दिनांक ३०-६-५५ अखेर भागांचें वसूल भांडवल | रु. | ८,३२,००० |
| (२) गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७,९६,००० |
| (३) एकूण ठेवी | रु. | १,६७,००,०००चे वर |
| (४) एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९१,१७,०००चे वर |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठे महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७७,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी
श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी
[illegible]


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छा[illegible] व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्र[illegible].